म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय वा० वा०
दा. क्र. 3972

# कांचनगंगा

IRBK-0103172
IRBK-0103172

३७०२

# कांचन गंगा

म. ग्रं. सं. ठाणें
बाल-वाङ्मय
५८०

★

लेखिका
विजया देवी वाळिंबे

IRBK-0103172
IRBK-0103172

महाराष्ट्र ग्रंथ भांडार लि., मुंबई ४.

विषय
क्रमांक
नों. दि.

# कांचनगंगा

★

लेखिका

सौ॰ विजयादेवी वाळिंबे

दि महाराष्ट्र ग्रंथभांडार लि॰, मुंबई नं. ४

किंमत ४ आणे

[ सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन ]

* *
*

प्रथमावृत्ति १९४४

द्वितीयावृत्ति १९४८

*
* *

मुद्रकः—**स. पां. जोशी**, रामदास मुद्रणालय, शिवाजी पार्क रोड नं. ३, दादर.

प्रकाशक—**शंकर वामन कुलकर्णी**, महाराष्ट्र ग्रंथभांडार, मुंबई ४.

मराठी ग्रं
अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

# शाळेंतील घंटा

चला लौकर शाळेंत. ती पहा घंटा वाजूं लागली.

मी शाळेंत या ठिकाणीं बसतों. गुरुजी मुलांना शिकवतात. गुरुजी उंच जागीं मेजावर बसतात. शेजारीं लांकडी फळा भिंतीला टांगलेला आहे. मुलें बांकावर बसतात. ही चाळीस मुलांची तुकडी मराठी पहिलीची होय.

गणू उभा राहून वाचीत आहे. गणूनें हातांत बूक धरलें आहे. या बुकाचें नांव 'कांचनगंगा' आहे. यांत छानदार माहिती आहे. इतर मुलें गणू कसा वाचतो तें ऐकत आहेत. गणू फारच छान वाचतो. जरूर तेथें तो थांबतो, सावकाश वाचतो.

आतां कथावाचनाचा तास आहे. शाळा नुकतीच सुरूं झाली आहे. या शाळेंत मुली नाहींत. ही मुलांची शाळा आहे. समोरील शाळा मुलींची आहे. माझी बहीण विमल तेथें जाते. तिचाही पहि-

लाच तास कथावाचनाचा आहे. ती ‘ ढग व पाऊस ’ हें बूक वाचील.

ही शाळेची घंटा आहे. रोज सकाळीं, दुपारीं व सायंकाळीं ही घंटा गडी वाजवतो.

रोज सकाळीं घंटा वाजते. ती मुलांना सांगते, ‘ चला, लवकर लवकर शाळेंत चला. उशीर करूं नका. घंटा मुलांना शाळेंत वेळेवर बोलावते. ’

रोज सायंकाळीं ही घंटा वाजते. सायंकाळीं ती मुलांना सांगते, ‘ पळा, शाळा सुटली. घरीं जाऊन खूप खेळा व ताकद्वान बना. ’

---

## अरब व उंट

उंटांचा तांडा वाळवंटांतून चालला आहे. दिवसा वाळवंटांत खूप उकडते व सायंकाळपासून गारठा पडूं लागतो. अंधार पडला कीं थंडी वाजूं लागते. वाळवंटांत एकही झाड दिसत नाहीं. सगळीकडे वाळूच वाळू दिसते. अरब लोक उंट पाळतात. ते घरांतून राहात नाहींत. तंबूंतून राहतात.

अनु क्र.
विभाग
नं.

एके दिवशीं सायंकाळीं वाळवंटांत एक अरब तंबू ठोकून राहिला होता. बाहेर एक उंट बसला होता. सायंकाळ होऊन गेली व अंधार पडूं लागला. थंडी सारखी वाढूं लागली. उंट गारठून कांकडूं लागला.

उंटानें अरबाला विनंती केली, 'महाराज, बाहेर फार थंडी आहे व मी गारठलों आहे. तरी माझे पाय मी शेकोटीजवळ सरकवतों.' अरबाला गरीब उंटाची दया आली. अरबानें सांगितलें, 'नुसते पायच कशाला, तुझें डोकेंही आंत घुसव.'

जरा वेळ गेला व उंटाला ऊब आली. मग उंटानें आणखी विनंती केली, 'महाराज, आतां मान फार गारठली आहे.'

'ठीक आहे. घाल आंत मान.' अरबानें सांगितलें. मान सरकवून उंटानें विनंती केली, 'महाराज, मी मागले पाय आंत घेतों. थंडी फारच आहे; पण जागा थोडी आहे. तर आपण जरा पलीकडे सरका.'

उंटानें मागील पाय आंत घेतांच तंबूचा दरवाजा सताड उघडला व गार वारा आंत येऊं लागला. 'मी

सगळाच आंत शिरतों मग गार वारा येणार नाहीं.' उंटानें सांगितलें. 'बरं, ये आंत.' अरबानें सांगितलें.

उंटाचें शरीर फार मोठें, व तंबू अगदींच लहान होता. उंटानें अरबाला 'सरका महाराज' अशी विनंती केली. पण अरबाला जागाच राहिली नाहीं. मग उंटानें सांगितलें. 'जागा तर थोडी आहे. एकानें बाहेर जावें हें बरें' 'तंबू माझा आहे. तूं बाहेर जा.' अरब रागानें बोलला.

'पण येथें एकाला पुरेल एवढी जागा आहे व मी मोठा आहे. बलवान आहे. उभा राहिलों तर तंबू उपटून टाकीन. समजलं ?' उंटानें सांगितलें.

अरब गुपचूप उठून बाहेर गेला.

---

## — सिंह व उंदीर —

एका जंगलांत एक सिंह रहात होता. तो रोज सकाळपासून दिवसभर झोंप घेई. सायंकाळीं झोपेंतून

अनुक्रम ९७३१ विभाग ५.५. क्रमांक ५८०

जागा होई. ' ह्रगुरर—गुरर ' करीत ओरडे आणि जंगलांतून बाहेर पडे.

सिंह ओरडूं लागतांच सगळे पशु थरथरां कांपत. पक्षी भराभर उडून झाडावरील घरांतून दडत. सिंह ओरडूं लागला कीं सगळीकडे एकच धांदल उडून जाई.

अंधार पडूं लागला कीं सिंह शिकारीला जाई. तो कांहीं तरी शिकार करी व ती घेऊन गुहेंत परत येई. मग जेवून जंगलांत भटके. सकाळीं सिंह गुहेंत येई. व दिवसभर झोंप काढी.

गुहेजवळ एक लहानसें बीळ होतें. तें एका लहान उंदराचें घर होतें. रोज उंदीर बिळांतून गुहेंत जाई व सिंहानें आणलेली शिकार मटकावी.

एके दिवशीं दुपारीं उंदराला भूक लागली. नेहमीं सारखा उंदीर गुहेंत शिरला. पण सिंह आज वांकडा निजला होता. उंदीर एकदम गेला तों सरळ पोटावर गडगडला. सिंहानें पटकन आपला पंजा उचलला व उंदराला धरलें.

"दया करा सरकार. मी गरीब भुकेला आहे. मला सोडा. मी चुकून अंगावर आलों. क्षमा करा;' उंदीर पाया पडूं लागला. सिंहानें उंदराला सोडून दिलें. उंदीर मांस घेऊन परत बिळांत गेला.

दोन चार दिवस झाले. एके दिवशीं सिंह एकदम जोरानें सारखा ओरडूं लागला. सारें रान दणाणून गेलें. पशु पक्षी आनंदून गेले. सिंह फासांत अडकला होता. रोज भिवविणारा सिंह आज फासांत सांपडला होता.

आरडा ओरडा ऐकून शिकारी सिंहाजवळ आले; व नीट पाहून परत गेले. सकाळीं ते सिंहाला मारणार होते. आतां सिंह फारच जोरानें ओरडूं लागला. सिंहाला कांहींच करतां येईना.

हा आरडा ऐकून उंदीर हळूंच बिळाबाहेर आला. सिंहाचा आवाज ओळखून तो तिकडे गेला. उंदरानें पाहिलें, समोर सिंह फासांत अडकला होता. पलीकडे शिकारी, सिंहाकडे बोटें दाखवीत, एकमेकांशीं बोलत होते. सिंह सारखा ओरडत होता.

उंदीर पळत गेला व फासाची दोरी कुरतडूं लागला. एक, दोन, तीन, चार, पांच;--भराभर उंदीर एकामागून एक दोरी तोडीत होता. सिंहानें तें पाहिलें. तो चूप राहिला. पांच मिनिटांत सिंह मोकळा झाला आणि त्यानें आनंदानें एक आरोळी ठोकली. तो आवाज ऐकतांच शिकारी पळाले. जनावरें भीतीनें कापूं लागलीं.

इकडे सिंह व उंदीर आनंदानें निघून गेले. आतां जरी झोपेंत अंगावरून उंदीर पळाला तरी सिंह रागावत नाहीं.

---

## शहाणा दिवाण

एक राजा होता. राजाजवळ खूप नोकर चाकर होते. पण दिवाण शहाणा होता. तो राजाचा सगळा कारभार पाही. खजिनाही तोच पाही. पैसा अडका तोच तपाशी. राजाचे बरेच नोकर राजा लहरींत असला कीं एकमेकांवर कुरघोडी करीत. चहाडी चुगली करीत आणि बढती मिळवीत.

दिवाण रोज खजिना तपाशी, तें कांहीं चुगल-खोरांना पाहवलें नाहीं. एके दिवशीं एक जण राजा-कडे गेला व त्यानें दिवाणाविषयीं खोटेंच सांगितलें कीं, ‘ दिवाण रोज पैसे खातो. ’

राजानें चुगलखोराचें ऐकून घेतलें.

दोन तीन दिवस गेले.

एके दिवशीं सकाळीं दिवाण नेहमींसारखा पैसे मोजीत होता. राजा गुपचूप मागें जाऊन दाराआड उभा राहिला.

दिवाणानें पैसे मोजून परत ठेवले व कुलुप लावलें. मग एक काळी पेटी उघडली. राजा सगळें पहात होता.

पेटींतून एक फाटका कोट दिवाणानें बाहेर काढला, अंगांत घातला व तिजोरीकडे पहात बसला. पांच मिनिटांनीं कोट काढला, पेटींत घातला व पेटीला कुलुप लावलें

राजानें तें पाहिलें आणि राजा पुढें झाला.

‘ हें काय आहे ? रोज येथें असेंच करतां कां ?

तो काळा फाटका कोट कसला व कुणाचा ?' राजानें विचारलें.

'सरकार, हा माझाच कोट आहे. मी गरीब होतों. एकच कोट मजजवळ होता. तोच हा कोट. याच कोटावर मी शहाणपणानें दिवाण झालों. आतां जरी मजजवळ खूप कोट आहेत तरी शहाणपणा शिकवणारा एकही कोट नाहीं. तो हाच आहे. शहाणपणा यावा यासाठीं मी तो रोज घालतों.'

राजा मनांत समजला कीं, 'मजजवळही खूप लोक आहेत पण शहाणा एकच आहे.'

मग राजानें चुगलखोर लोकांना शासन केलें.

---

## सकाळ

'काव—काव—काव—काव' कावळे ओरडूं लागले.
'चिव—चिव—चिव—चिव' चिमणी उडूं लागली.
'कुकूकू—कुकूकू—कुकूकू' कोंबडे आरवूं लागले.
'हॉ-ऽ-ऽ-हॉ-ऽ-ऽ-हॉ' गाई—वासरें हंबरूं लागलीं.

'थरर्—थरर्—थरर्' धनगर मेंढरांना उठवूं लागले.

'टण्—टण्—टण्—टण्' शाळेची घंटा वाजूं लागली.

आतां सकाळ झाली.

सगळीकडे गडबड सुरूं झाली.

जो तो भराभर काम करूं लागला.

पक्षी चारा शोधावयाला निघाले. कोंबडीं दाणे टिपूं लागलीं. गाई--वासरें चरावयाला कुरणांत निघालीं. शेतकरी नांगराला बैल जुंपूं लागले. नोकर कामावर जावयास निघाले. जो तो कामाला लागला.

मुलें शाळेंत जाऊं लागलीं. कोणी एकटाच, तर कांहीं दोन दोन चार चार अशा गटानें मुलें शाळेला येऊं लागलीं.

सकाळची हवा फार छान असते. किंचित् गारठा पडलेला असतो. वडील माणसें फिरावयाला जातात. मोठीं मुलें वाचीत असतात. कारण तीं दुपारीं शाळेंत जातात. लहान मुलें सकाळीं शाळेंत जातात.

आमची शाळा जरी मोठी आहे, तरी जागा पुरत नाहीं. शाळेंत खूप मुलें आहेत. लहान मुलें सकाळीं

येतात व मोठीं दुपारीं येतात.

आतां सकाळ झालेली आहे. माझी शाळा आठ वाजतां सुरूं होते. मला आतां बोलायला वेळ नाहीं. हा पहा मी चाललोंच.

सकाळीं वेळ फुकट घालवूं नये.

---

## दुपार

आतां दुपार झाली. सकाळपासून कामें करून लोक थकले. शेतकरी आतां बैल सोडून जेवावयास बसतील. बैल वैरण खातील. लहान मुलें जेवावयास बसतील.

नोकर कचेरींत काम करतील. ते थोडावेळ काम थांबवतील. अगदींच थोडा वेळ. कारण ते सकाळीं कचेरींतून कामाला येत नाहींत. अकरा वाजतां येतात. पण बाकीचे सगळे सकाळपासून कामाला लागतात. मग दुपारीं बराच वेळ सुटी घेतात.

कचेरींत जाणारे कारकून साडे नऊ वाजतां जेव-

तात. इतर सगळे दुपारीं साडेबारा एक वाजतां जेवतात. हीच जेवणाची खरी वेळ. जेवण होतांच कामाला लागूं नये. थोडा वेळ जाऊं देऊन मग कामाला सुरवात करावी.

लहान मुलें सकाळीं शाळेंत जातात. दुपारीं खेळतात.

विटी दांडू, चेंडू वगैरे खेळ मुलें खेळतात.

मुली सागरगोटे, चेंडू वगैरे खेळ खेळतात.

कडक ऊन असतांना बाहेर खेळूं नये.

सावलींत खेळावें.

सकाळपासून काम करून आई थकून जाते व दुपारी थोडा वेळ निजते. लहान मुलांनीं आईजवळ जाऊन दंगा करून तिची झोंप मोडूं नये.

सकाळपासून खेळून व शाळेंत जाऊन मुलें थकतात. दुपारीं लहान मुलांनींही झोंप काढावी.

सारांश दुपारीं ऊन कडक पडते. या वेळीं गडबड करूं नये. शांतपणानें खेळावें अगर झोपीं जावें.

---

अनुक्रम १७३७१
विभाग आ।आ
क्रमांक १८०
नों. दि. ३०/३/५३

## सायंकाळ

हें पहा ऊन खालीं जातें चाललें. घराची सावली मोठी होऊं लागली.

थोडा थोडा वारा सुटूं लागला. हवेंत किंचित् गारठा वाटूं लागला.

सायंकाळ होऊं लागली. पक्ष्यांचा किलबिलाट सुरूं झाला. मोठीं मुलें शाळा सुटून घरीं आलीं. जरा वेळानें कचेरींतून कारकून सुटतील.

गुराखी गांवाकडे गुरें घेऊन परत येऊं लागले.

धनगर मेंढरांना एके ठिकाणीं जमा करूं लागला.

लहान मुलें खेळून परत आलीं.

हात, पाय, तोंड धुवून देवघरांत गेलीं.

देवापुढें जाऊन डोकें जमिनीवर टेकून देवाला वंदन केलें.

नंतर ताई परवचा सांगूं लागली.

अगदीं लहान मुलांनीं शंभर अंक मोजले. सगळीं मुळाक्षरें ताईला सांगितलीं. मग ताईनें मुलांना पुढील अवघड धडा सांगितला.

आतां अंधार पडूं लागला.

सगळीकडे दिवे लागले.

'चला रे जेवायला' आईनें सांगितलें.

मुलें भराभर पळत गेलीं.

जेवणघरांत ओळीनें पाट मांडले होते. पुढें ताटें होतीं. एकेक ताटाजवळ एक एक वाटी ठेवली होती.

आईनें ताटांत भात वाढला. मीठ, चटणी, भाजी, आमटी ताईनें वाढली. मुलें सावकाश जेवूं लागलीं. कोणीही जमिनीवर सांडलें नाहीं. जेवणें झालीं. मुलांनीं हात धुतले. तोंडें धुतलीं. हात पुसून कोरडे केले.

बाहेर चांदणें पडलें होतें. लगेच मुलांचा खेळ सुरूं झाला.

खेळून तीं दमलीं आणि झोपीं गेलीं.

---

## गोल घर

आज रविवार होता. शाळेला सुटी होती. दुपारपासून मुलांचा दंगा जोरांत चालूं होता. सायंकाळ

झाली तरी दंगा संपला नाहीं. कारण आज़ मुलांना धडे वाचावयाचे नाहींत. किंवा अंक लिहावयाचे नाहींत.

दिवे लागावयाची वेळ झाली तरी दंगा संपेचना. आई देवाला जाऊन आली. बाबा बाहेर जाऊन आले. तरी दंगा चालूच. शेवटीं आजोबा आले. 'ए चला रे गोड घरांत राहायला' एकदम आजोबांचा आवाज पोरांनीं ऐकला.

सगळीजणं गुपचूप बसलीं.

'हें पहा मी आतां एक गंमत सांगणार आहे' सगळीं पोरें एके ठिकाणीं जमलीं.

'एक माणूस एकदां घर बांधूं लागला. घराला सामान हवें होतें. मग तो इकडे तिकडे फिरूं लागला व सामान जमवूं लागला. गुळाची एक एक ढेप आणून ठेवली. काकवीची एक एक घागर आणून ठेवली. पांचशें ढेपा गूळ व शंभर घागरी काकवी जमा झाली. मग उसाची एक मोळी आणली. नारळ आणून खोबरें काढलें. एक एक नारळांतून खोबरें

काढून दोन दोन भकलें काढलीं. आतां गोड घर बांधावयाची तयारी झाली—'

मुलें मौजेनें ऐकत होतीं.

'माणसानें गुळाची एक भिंत बांधली. नंतर दुसरी बांधली. नंतर तिसरी बांधली व शेवटीं चौथी बांधली. काकवीचा रंग दिला. मग तो भिंतीला शिडी लावून वर चढला. उसाचे वासे भिंतीवर घातले. भकलांचीं कौलें घातलीं. आतां घर तयार झालें.'

'या घरांत कोण कोण रहायला येणार ?'

सगळेजण एकदम ओरडूं लागलें—'मी येणार, 'मी येणार—'

'पण पहा हो, तेथें तांबडे मुंगळे चावतील,' आजोबा आपला कोट काढीत बोलले. 'कारण तें गोड घर आहे.'

---

## कांचनगंगा

कांचनगंगा हें एका खूप उंच डोंगराचें उंचच उंच शिखर आहे. या शिखरावर सारखें हिम पडत असतें.

या उंचच उंच डोंगराला हिमालय असें नांव आहे.

हिमालयांत कांचनगंगेसारखीं खूप शिखरें आहेत. पण कांचनगंगा, गौरीशंकर आणि धवलगिरी या तीन शिखरांचा नंबर अगदीं वर आहे.

या शिखरावर आकाशांतून पांढरें हिम सारखें पडतें व तें हळूं हळूं वरून खालीं घसरतें. मग या हिमाची एक नदीच बनते. तिला हिमनदी असें नांव देतात.

या शिखरावरून चढतां येत नाहीं. तेथें अतिशय कडक थंडी असते. सगळीकडे हिम सारखें पडतच असतें. वर चढून जावयास पाय कोठें ठेवावा हेंच समजत नाहीं; आणि वर जातां येत नाहीं.

खूप धाडशी लोकांनीं येथें जावयाचें ठरविलें होतें. पण अगदींच थोडे—एखादा दुसराच—तेथें पोंचला आहे. बाकीचे परत आले व कांहींजण हिमांत बुडून मेले. ते सांपडलेच नाहींत.

वर हिमाचें पांढरें शिखर, खालीं हिमालयाचीं जंगलें. या ठिकाणीं देखावा फारच सुंदर दिसतो.

सकाळीं, दुपारीं व सायंकाळीं हे देखावे सारखे बदलतात. कांहीं ठिकाणीं उंच ठिकाणाहून पाणी खालीं पडतें तेथें फारच चांगली शोभा दिसते.

मुलांनीं मोठें होतांच खूप हिंडावें. सगळीकडे फिरावें. खूप ठिकाणीं जावें. पाहावयाजोगतें कांचनगगा हें हिमालयांतील शिखर मोठेपणीं जरूर पहावें.

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
क्र. 3962

विसरूं नका हं !

सुलभ रामायण
बालकांड
भाग १ ते ४

सुलभ महाभारत
भाग १ ते ७

चतुर बिरबल
भाग १ ते ७

चौथींत गेल्यावर तुमच्या इति
रामायणाची गोष्ट थोडक्यांत
वाचनांत येईल त्यावेळीं या पु
ती गोष्ट सविस्तर सांगितली अ
जरूर जरूर वाचा.

तशीच

महाभारताचीहि गोष्ट या पुस
भागांत क्रमशः सांगितलेली अ
वाचल्याशिवाय तुम्ही राहणार
हा इतिहास झाला. चातुर्याच
पाहिजे असतील तर—

बिरबलाच्या गोष्टी वाचा.
बुद्धी, हजरजबाबीपणा इत्या
गुण पाहून तुम्ही आश्चर्याने

IRBK-0103172

IRBK-0103172

विसरूं नका ह